## निशाणी क्र.५९ खाली आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज हा त्रयस्त पक्ष सौ.शालिनी साहेबराव आस्मे यांनी सादर केलेला आहे. तिच्या कथनानुसार ती मयत सदाशिव यांची वारस आहे व अपेलंट १ व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांची ती बहिण आहे. वादीने/अपेलंट यांनी वाटपाचा दावा दाखल केलेला होता व तो दावा खारीज करणेत आलेला होता. त्याचे प्रमुख कारण हे होते की, वादीने त्यामध्ये बहिणीला म्हणजे त्रयस्त इसम श्रीमती शालिनी आस्मे हिला पक्ष केलेले नव्हते. अशा परिस्थितीमध्ये बहिण श्रीमती शालिनी हिने अर्ज केला की, तिला सदरच्या अपिलाचे सुनावणीमध्ये भाग घेवु द्यावा. शेवटी विनंती केली की, तिचा अर्ज निशाणी क्र.५९ मंजुर व्हावा.

२) सदरच्या अर्जाला अपेलंट यांनी ''योग्य तो आदेश पारित करावा'' अशा प्रकारचे म्हणणे सादर केलेले आहे. रिस्पॉडंट क्र.९ ते १२ यांनी सदरच्या अर्जाला विरोध दर्शविला आहे. कारण सदरचा अर्ज हा अतिउशिरा सादर केलेला आहे.

३) सदरच्या प्रकरणामध्ये गैरअपिलार्थी क्र.१ ते ८ यांनी "योग्य आदेश व्हावा'' अशा प्रकारचे म्हणणे सादर केलेले आहे.

४) अपेलंटचे वकील श्री.डी.जे. जगदाळे हजर. तसेच त्रयस्त पक्ष हिचे वकील श्री.आर.आर. भोसले हजर. रिस्पॉडंट नं.९ ते १२ यांचे वकील हे दुपारी १.४० पर्यंत पुकारले असता गैरहजर. कोणत्याही प्रकारचा अर्ज दिलेला नाही.

५)  हजर असलेल्या वकीलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. रिस्पॉडंट नं.९ ते १२ चे म्हणणे विचारात घेण्यात आले. ह्याबाबत वाद नाही की, दिवाणी न्यायाधीश, क.स्तर यांचे समोर वाटणी व ताबा मिळण्याचा दावा दाखल केलेला होता. ह्याबाबत वाद नाही की, त्रयस्त इसम सौ.शालिनी आस्मे ही अपेलंट क्र.१ व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांची बहिण आहे. वादीचे असे म्हणणे होते की, वादातील मिळकत ही वडिलोपार्जित होती. अशा परिस्थितीमध्ये त्रयस्त पक्ष बहिण ही तथाकथीत सहभागीदार असल्याचे दिसुन येते. त्यामुळे ती प्रकरण गुणवत्तेवर काढणेसाठी आवश्यक पक्षकार ठरते. केवळ त्रयस्त पक्षाने उशिरा सदरचा अर्ज सादर केला, हे कारण अर्ज नामंजुर करणेसाठी योग्य असु शकत नाही. अभिलेखावर असे कोणतेही कारण उपलब्ध नाही, जेणेकरुन अर्ज क्र.५९ नामंजुर केला जाऊ शकतो. करिता निशाणी क्र.५९ चा अर्ज, प्रकरण गुणवत्तेवर निकाली करणेसाठी मंजुर करणे आवश्यक आहे, जेणेकरून तिला स्वतःची बाजु मांडता येईल. करिता खालील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

## आदेश

१)  अर्ज निशाणी क्र.५९ मंजुर करणेत येत आहे व त्रयस्त इसम सौ.शालिनी साहेबराव आस्मे हिला अपिलामध्ये सामील करून तिला आपले म्हणणे सादर करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

वाई.  (आर.एन.मेहरे)
दि.१९/०८/२०२५  जिल्हा न्यायाधीश-१, वाई

## निशाणी क्र.६५ खाली आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज हा अपिलार्थी यांनी आवश्यक पक्षकार म्हणुन सामील करून घेणेसाठी सादर केलेला आहे. अपिलार्थी यांचे कथनानुसार दावा मिळकतींचे सरसनिरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी रे.दि.मु.नं.१७२/२०१० दाखल केला होता.

२) सदर दाव्याचे कामी अपेलंट यांचे बहिणींनी रजिस्टर हक्कसोडपत्र करून दिले असल्यामुळे त्यांना दाव्याचे कामी सामील केले नव्हते. परंतु दिवाणी न्यायाधीश, क.स्तर यांनी Non-Joinder of Necessary Parties या तांत्रीक मुद्यावरून वादीचा मुळ दावा फेटाळुन लावला. सदर अपिलामध्येही सदर मुद्याची बाधा येते की काय अशी भिती अपेलंट यांना वाटू लागली आहे. अपेलंट यांची एक बहिण शालिनी आस्मे यांनी नि.५९ अन्वये प्रकरणात सामील करून घेणेसाठी अर्ज सादर केलेला आहे. सबब अपेलंट यांनी त्यांच्या आणखी दोन बहिणी नामे अनुसया बाळा शिंगटे, शोभा सुर्वे व एक चुलत बहिण निलीमा धुमाळ हे आवश्यक पक्षकार असल्यामुळे त्यांना अपिलाचे मध्ये रिस्पॉडंट म्हणुन सामील करणेसाठी विनंती केली आहे. अनुसया शिंगटे ही दि.०६/०७/२०१२ रोजी मयत झालेली आहे. त्याबाबत अपिलार्थी यांनी नि.७२ लगत मृत्यु दाखल दाखल केलेला आहे.

३) सदरच्या प्रकरणामध्ये गैरअपिलार्थी क्र.१ ते ८ यांनी "सामील करणेस रिस्पॉडंट यांची हरकत नाही'' अशा प्रकारचे म्हणणे सादर केलेले आहे.

४) अपेलंटचे वकील श्री.डी.जे. जगदाळे हजर. रिस्पॉडंट नं.९ ते १२ यांचे वकील हे दुपारी ५.०० पर्यंत पुकारले असता गैरहजर. कोणत्याही प्रकारचा अर्ज दिलेला नाही.

५) हजर असलेल्या वकीलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. रिस्पॉडंट नं.९ ते १२ चे म्हणणे विचारात घेण्यात आले. ह्याबाबत वाद नाही की, दिवाणी न्यायाधीश, क.स्तर यांचे समोर वाटणी व ताबा मिळण्याचा दावा दाखल केलेला होता. ह्याबाबत वाद नाही की, अनुसया बाळा शिंगटे, शोभा सुर्वे व निलीमा धुमाळ अपेलंट क्र.१ व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या बहिणी आहेत. वादीचे असे म्हणणे होते की, वादातील मिळकत ही वडिलोपार्जित होती. अशा परिस्थितीमध्ये सदर बहिणी ह्या तथाकथीत सहभागीदार असल्याचे दिसुन येते. त्यामुळे ते प्रकरण गुणवत्तेवर काढणेसाठी आवश्यक पक्षकार ठरते. केवळ उशिरा सदरचा अर्ज सादर केला, हे कारण अर्ज नामंजुर करणेसाठी योग्य असु शकत नाही. अभिलेखावर असे कोणतेही कारण उपलब्ध नाही, जेणेकरुन अर्ज क्र.६५ नामंजुर केला जाऊ शकतो. करिता निशाणी क्र.६५ चा अर्ज, प्रकरण गुणवत्तेवर निकाली करणेसाठी मंजुर करणे आवश्यक आहे, जेणेकरून त्यांना स्वतःची बाजु मांडता येईल. करिता खालील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

## आदेश

१) अर्ज निशाणी क्र.६५ मंजुर करणेत येत आहे व शोभा सुर्वे, अनुसया बाळा शिंगटे मयत तर्फे वारस संभाजी, सुनिल, भास्कर, कांचन, सुनंदा, सुरेखा, व निलीमा धुमाळ यांना अपिलामध्ये सामील करून त्यांना आपले म्हणणे सादर करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

RAJENDRA NARAYANRAO MEHARE

Digitally signed by RAJENDRA NARAYANRAO MEHARE
Date: 2025.08.20 17:59:20 +0530

वाई. (आर.एन.मेहरे)
दि.१९/०८/२०२५ जिल्हा न्यायाधीश-१, वाई